RNI NO. MAHMAR/25/A3029

लातूर

वर्ष : ७ वे, अंक नं. : ४७

दि. ०९ जून २०२६, वार : मंगळवार

पाने : ४, किंमत : स्वागत मूल्य २ रू.

दैनिक

# महावृत्त

E-mail : dainikmhavratt@gmail.com

संपादक : अशोक हनवते, मो. 9421094991, 7264079990

# वृद्ध महिलेच्या न्यायासाठी लातूर प्रशासनाची ठोस कारवाई

# गट नं. १८/१ संदर्भातील बक्षीसपत्र व फेरफार रद्द

**लातूर/प्रतिनिधी : ज्येष्ठ नागरिकांच्या हक्कांचे संरक्षण करण्यासाठी शासनाने लागू केलेल्या आई-वडील व ज्येष्ठ नागरिकांचा निर्वाह व कल्याण अधिनियम, २००७ ची प्रभावी अंमलबजावणी करत लातूर येथील पालक व ज्येष्ठ नागरिक न्यायाधिकरणाने एका वृद्ध महिलेला दिलासा देणारा महत्त्वपूर्ण निर्णय दिला आहे. उपविभागीय अधिकारी तथा अध्यक्ष, पालक व ज्येष्ठ नागरिक न्यायाधिकरण, लातूर श्रीमती रोहिणी नऱ्हे-विरोळे यांनी दिलेल्या या आदेशामुळे ज्येष्ठ नागरिकांच्या मालमत्ता हक्कांचे संरक्षण करण्याच्या दृष्टीने एक आदर्श निर्माण झाला आहे.**

## उपविभागीय अधिकारी रोहिणी नऱ्हे-विरोळे यांच्या निर्णयाचे सर्वत्र स्वागत




मौजे कारसा, ता. जि. लातूर येथील गट नंबर १८/१ क्षेत्र ३ हेक्टर १८ आर ही शेती जमीन अर्जदार सौ. हौसाबाई लहाडे यांच्या मालकीची होती. वृद्धापकाळात सांभाळ, देखभाल व आधार मिळावा या विश्वासाने त्यांनी आपल्या नातू व पणतू यांच्या नावे नोंदणीकृत बक्षीसपत्र क्रमांक ५०७५/२०२० द्वारे सदर जमीन हस्तांतरित केली होती. या हस्तांतरणामागे कोणताही आर्थिक व्यवहार नसून, कुटुंबातील सदस्यांकडून प्रेम, आधार आणि पालनपोषण मिळावा हीच अपेक्षा होती.

मात्र बक्षीसपत्रानंतर संबंधित लाभार्थ्यांनी ज्येष्ठ महिलेची अपेक्षित देखभाल केली नाही. त्यांच्या दैनंदिन गरजा, आरोग्याची काळजी तसेच सामाजिक व कौटुंबिक जबाबदाऱ्या पार पाडण्यात दुर्लक्ष झाल्याने सौ. हौसाबाई लहाडे यांनी न्यायासाठी पालक व ज्येष्ठ नागरिक न्यायाधिकरणाकडे धाव घेतली.

प्रकरणातील सर्व कागदपत्रे, बक्षीसपत्रातील अटी, महसुली नोंदी, पुरावे आणि दोन्ही बाजूंचा युक्तिवाद विचारात घेऊन न्यायाधिकरणाने महत्त्वपूर्ण आदेश पारित केला. या आदेशानुसार नोंदणीकृत बक्षीसपत्र क्रमांक ५०७५/२०२० रद्द करण्यात आले असून त्याआधारे करण्यात आलेला फेरफार देखील रद्द करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. परिणामी सदर जमिनीवरील मालकी हक्क पुन्हा अर्जदारांच्या नावावर पुनर्स्थापित करण्याचा मार्ग मोकळा झाला आहे.

यासोबतच संबंधितांनी सदर जमिनीवर मालकीच्या आधारावर घेतलेले शासकीय अनुदान, पीक विमा, आर्थिक लाभ किंवा इतर कोणत्याही स्वरूपातील लाभ व्याजासह परत करण्याबाबत आदेश देण्यात आले आहेत. तसेच भविष्यात अर्जदारांच्या मालमत्तेत कोणत्याही प्रकारचा हस्तक्षेप करू नये, असे स्पष्ट निर्देशही न्यायाधिकरणाने दिले आहेत.

या निर्णयामुळे एक महत्त्वाचा कायदेशीर संदेश समोर आला आहे. ज्येष्ठ नागरिकांनी केवळ विश्वासापोटी मालमत्ता हस्तांतरित न करता बक्षीसपत्र, खरेदीखत किंवा इतर दस्तांमध्ये पालनपोषण, देखभाल आणि सांभाळाची स्पष्ट अट नमूद करणे आवश्यक आहे. अशा अटींचे उल्लंघन झाल्यास २००७ च्या कायद्यानुसार मालमत्ता हस्तांतरण रद्द होऊ शकते, हे या प्रकरणातून पुन्हा सिद्ध झाले आहे.




उपविभागीय अधिकारी श्रीमती रोहिणी नऱ्हे-विरोळे यांनी ज्येष्ठ नागरिकांच्या तक्रारींवर संवेदनशीलतेने आणि तत्परतेने कार्यवाही करत दिलेला हा निर्णय अत्यंत प्रशंसनीय आहे. त्यांच्या न्यायनिष्ठ, लोकाभिमुख आणि संवेदनशील भूमिकेमुळे अनेक ज्येष्ठ नागरिकांना आपल्या हक्कांसाठी पुढे येण्याचा आत्मविश्वास मिळणार आहे.

ज्येष्ठ नागरिकांचा सन्मान, सुरक्षा आणि मालमत्ता हक्कांचे रक्षण करण्यासाठी अशा निर्णयांची व्यापक जनजागृती होणे ही काळाची गरज असून, लातूर प्रशासनाने दिलेला हा न्याय समाजासाठी दिशादर्शक ठरणारा आहे.

# महाराष्ट्रस्तरीय क्रिकेट स्पर्धेत रत्नागिरी विजेते तर लातूर उपविजेते

**लातूर/प्रतिनिधी :** मुंबई येथे दि. ६ व ७ जून रोजी महाराष्ट्रातील बालरंगभूमी परिषदेच्या विविध जिल्हा शाखांतर्गत बालरंगभूमी क्रिकेट लीग (बीसीएल) संपन्न झाली. या स्पर्धेत महाराष्ट्रातील विविध विभागातील निवडक १६ जिल्हा शाखाचे संघ सहभागी झाले होते.

या स्पर्धेत लातूर शाखेच्या लातूरकर लायन्स संघाने अहिल्यानगर, सांगली व पुणे संघांना पराभूत करुन बीसीएल च्या अंतिम फेरीत धडक मारली.

अंतिम फेरीत लातूरकर लायन्स विरुद्ध रत्नागिरी मँगो किंग्स अशी लढत झाली. अत्यंत चुरशीच्या व अटीतटीच्या या सामन्यात रत्नागिरी मँगो किंग्स विजेता ठरला तर लातूरकर लायन्स उपविजेते ठरले.

विजेत्या संघास रु. ५१०००/- व करंडक तर उपविजेत्या संघास रु. ३१०००/- व करंडक देऊन बालरंगभूमी परिषद, महाराष्ट्रच्या



अध्यक्षा निलम शिर्के, उपाध्यक्ष व लातूरचे सुपुत्र ॲड. शैलेश गोजमगुंडे, प्रमुख कार्यवाह सतीश लोटके यांच्या हस्ते गौरविण्यात आले.

स्पर्धेतील सर्वोत्कृष्ट गोलंदाज लातूरचाच पंकज सुरवसे ठरला. स्पर्धेतील यशस्वी संघात राहुल गायकवाड ( कर्णधार ), रणजित आचार्य ( उप कर्णधार ), मयुर राजापूरे, शुभम सालमे, शैलेश तिवारी, नितीन पुट्टेवाड, पंकज सुरवसे, मुन्ना कोरे, आकाश माने, आकाश बाभळे, कृष्णा खानापुरे, विशाल वाटवडे, राम रेड्डी यांनी उत्कृष्ट कामगिरी केली. या संघाचे विविध स्तरावर कौतुक होत आहे.

## आला रे आला.. हरनाई, सोलापूरमार्गे मान्सून पुढे, लवकरच राज्यात पावसाच्या सरी; हवामान विभागाने दिली माहिती

**मुंबई/प्रतिनिधी** :महाराष्ट्रातील मान्सूनचे आगमन लांबणीवर पडल्याने शेतकऱ्यांनी पेरणीची घाई करू नये, असे आवाहन हवामान विभागाकडून करण्यात आलं आहे. शेतकऱ्याना दुबार पेरणी करण्याची वेळ येऊ नये यासाठी मान्सूनपूर्व कल्पना शेतकऱ्यांना देण्यात आली आहे.

तर, जून महिन्याचा पहिला आठवडा संपल्यानंतरही मान्सूनच्या पावसाचे आगमन न झाल्याने शेतकरी चिंतेत आहे. याबाबत सातत्याने हवामान विभागाकडून माहिती देण्यात येत आहे. मात्र, आता आनंदाची बातमी असून राज्यात मान्सूनची आणखी आगेकूच पाहायला मिळत आहे. ८ जून रोजी नैऋत्य मान्सून महाराष्ट्राच्या आणखी काही भागांत दाखल झाला असून हरनाई, सोलापूर मार्गे मान्सूनची उत्तर सीमा पुढे सरकल्याची माहिती हवामान विभागाकडून देण्यात आली आहे.

## भारतातील आर्थिक राजकीय संकटे-वास्तव आणि परिणाम' विषयावर टिळक भवनमध्ये १३ जूनला विशेष चर्चासत्र

**मुंबई/प्रतिनिधी** : माजी केंद्रीय अर्थमंत्री यशवंत सिन्हा, अर्थतज्ज्ञ अरुणकुमार, पृथ्वीराज चव्हाण व प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांचा सहभाग.

महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीच्या अर्थशास्त्र विभाग व ऑल इंडिया प्रोफेशनल काँग्रेसच्या वतीने दिनांक १३ जून २०२६ रोजी काँग्रेस पक्षाचे मुख्यालय टिळक भवन येथे एका विशेष चर्चासत्राचे आयोजन करण्यात आले आहे. 'भारतातील आर्थिक राजकीय संकटे-वास्तव आणि परिणाम' विषयावर हे चर्चासत्र असून माजी केंद्रीय अर्थमंत्री यशवंत सिन्हा, अर्थतज्ज्ञ अरुणकुमार, माजी मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण, माजी खासदार कुमार केतकर, प्रदेश काँग्रेसच्या अर्थशास्त्र विभागाचे प्रमुख विश्वास उटगी हे या चर्चासत्रात सहभागी होत आहेत तर कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ आहेत.

देश सध्या गंभीर आर्थिक संकटातून जात असून महागाई प्रचंड वाढलेली आहे, बेरोजगारांची संख्याही दिवसेंदिवस वाढत आहे, कामगार क्षेत्रावर संकट आले आहे. नवीन नोकऱ्या उपलब्ध होत नाहीत, उलट कंत्राटी पद्धतीने नोकरभरती केली जात आहे. नोटबंदी व जीएसटीमुळे कृषी क्षेत्र व उत्पादन क्षेत्र पूर्णपणे कोलमडून पडले आहे.

# हरवलेले १० मोबाईल शोधून मालकांना परत दिले

## गांधी चौक पोलिसांची कामगिरी

**लातूर/प्रतिनिधी :** तंत्रज्ञानाच्या युगात मोबाईल फोन हा प्रत्येक नागरिकाच्या दैनंदिन जीवनाचा अविभाज्य भाग बनला आहे. मोबाईल हरवणे म्हणजे केवळ आर्थिक नुकसान नव्हे, तर त्यामध्ये साठवलेली वैयक्तिक माहिती, संपर्क, कागदपत्रे आणि आठवणी गमावण्याची भीतीही नागरिकांना सतावत असते. अशा परिस्थितीत नागरिकांच्या अडचणी समजून घेत त्यांना दिलासा देण्याचे महत्त्वपूर्ण कार्य गांधी चौक पोलीस ठाण्याने करून दाखविले आहे.

लातूर शहरातील गजबजलेल्या बसस्थानक परिसर, गंजगोलाई, मार्केट यार्ड, कापड लाईन, सराफ लाईन तसेच इतर गर्दीच्या ठिकाणी अनेक नागरिकांचे मोबाईल फोन हरवले होते. याबाबत विविध नागरिकांनी गांधी चौक पोलीस ठाण्यात तक्रारी दाखल केल्या होत्या. या तक्रारींची गांभीर्याने दखल घेत लातूर जिल्हा पोलीस दलाने हरवलेले मोबाईल शोधण्यासाठी विशेष मोहीम राबविली.

पोलीस अधीक्षक श्री. अमोल तांबे, मा. अपर पोलीस अधीक्षक श्री. मंगेश चव्हाण तसेच मा. उपविभागीय पोलीस अधिकारी श्री. समीरसिंह साळवे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस ठाणे गांधी चौकचे प्रभारी अधिकारी पोलीस निरीक्षक श्री. सुनिल रेजितवाड यांच्या नेतृत्वाखाली विशेष पथकाची स्थापना करण्यात आली.

सदर पथकाने अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून हरवलेल्या मोबाईलचा शोध घेण्यास सुरुवात केली. यामध्ये विशेषतः केंद्र शासनाच्या CEIR (Central Equipment Identity Register) प्रणालीचा प्रभावी वापर करण्यात आला. या मोहिमेत पोलीस अंमलदार योगेश चिंचोलीकर यांनी सातत्यपूर्ण पाठपुरावा, तांत्रिक विश्लेषण आणि माहिती संकलनाच्या माध्यमातून हरवलेल्या मोबाईलचा मागोवा घेतला.

सखोल तांत्रिक तपास आणि



सातत्यपूर्ण प्रयत्नांमुळे विविध ठिकाणी हरवलेले एकूण १० मोबाईल फोन शोधून काढण्यात पोलिसांना यश आले. हस्तगत करण्यात आलेल्या मोबाईलची एकूण किंमत अंदाजे २ लाख रुपये इतकी आहे. त्यानंतर संबंधित मोबाईल धारकांचा शोध घेऊन सर्व मोबाईल कायदेशीर प्रक्रिया पूर्ण करून त्यांच्या मूळ मालकांच्या ताब्यात देण्यात आले.हरवलेला मोबाईल परत मिळाल्यानंतर अनेक नागरिकांनी गांधी चौक पोलिसांचे आभार व्यक्त केले. नागरिकांनी हरवलेल्या मोबाईल बाबत पोलीस ठाण्यात अथवा CEIR पोर्टलवर नोंद करण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

# चर्मकार व ढोर समाज स्मशानभूमीच्या नोंद व हस्तांतरणासाठी राष्ट्रीय चर्मकार महासंघाचे जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन



**लातूर/प्रतिनिधी :** लातूर तालुक्यातील मुरुड येथील चर्मकार व ढोर समाजाच्या स्मशानभूमीची महसूल अभिलेखात नोंद करून सदर जागा अधिकृतपणे समाजाच्या ताब्यात हस्तांतरित करण्याच्या मागणीसाठी आज मा. निवासी जिल्हाधिकारी, लातूर यांना निवेदन सुपूर्द करण्यात आले.

राष्ट्रीय चर्मकार महासंघाचे लातूर जिल्हाध्यक्ष मा. रवि कुरिल यांच्या नेतृत्वाखाली हे निवेदन देण्यात आले. याप्रसंगी महासंघाचे जिल्हा उपाध्यक्ष राजेंद्र साबळे, मुरूड शहर अध्यक्ष सुजित साबळे, अशोकराव जाधव सर, भिमराव वाघमारे, बिभिषण शेरखाने, मल्हारी साबळे, विष्णूदास साबळे, अतुल शेरखाने, परमेश्वर साबळे,पांडुरंग वाघमारे, श्रीधर साबळे, वैजेनाथ कांबळे, शुभम साबळे, रमाकांत कदम, पिंटू सातपुते यांच्यासह मोठ्या संख्येने समाजबांधव उपस्थित होते.

समाजाच्या अंत्यसंस्काराच्या मूलभूत हक्कासाठी ही जागा त्वरित अधिकृत करण्याची मागणी निवेदनाद्वारे करण्यात आली. अन्यथा मुरुड येथील चर्मकार आणि ढोर समाजाच्या वतीने तीव्र आंदोलन करण्याचा इशारा यावेळी देण्यात आला.

संपादकीय...

## प्लास्टिकमुक्त समुद्राचे ध्येय...

समुद्रातील प्लास्टिक कचरा ही आज सर्वात मोठी समस्या बनली आहे. जगातील आकाराने सर्वात मोठ्या प्रशांत महासागरात तर प्लास्टिकचा एक प्रचंड मोठा तरंगणारा ढीग तयार झाला आहे, ज्याला 'द ग्रेट पॅसिफिक गारबेज पॅच' म्हटले जाते. हा ढीग आकाराने भारताच्या क्षेत्रफळापेक्षाही मोठा आहे. या समुद्री कचऱ्याचे काय करायचे, या प्रश्नाने जगातील मोठे वैज्ञानिक आणि सरकारे हतबल झाली होती. त्या समस्येला आव्हान दिले आहे बोयान स्लाट या तरुणाने! नेदरलँडस्मध्ये राहणारा बोयान स्लाट हा एक सामान्य मुलगा होता. वयाच्या १६ व्या वर्षी (२०१० मध्ये) तो ग्रीसमध्ये समुद्रकिनारी सुट्ट्या घालवण्यासाठी गेला होता. तिथे समुद्रात डायव्हिंग करताना त्याला एक धक्कादायक गोष्ट दिसली. पाण्याखाली माशांपेक्षा जास्त प्लास्टिकच्या पिशव्या आणि कचरा तरंगत होता. हा अनुभव बोयानच्या मनाला लागला. त्याने शिक्षकांकडे, मित्रांकडे विचारणा केली की, 'आपण हा कचरा साफ का करत नाही?' त्यावर सर्वांनी एकच उत्तर दिले, 'समुद्र खूप मोठा आहे, तिथून कचरा साफ करणे अशक्य आहे. त्यासाठी हजारो वर्षे आणि अब्जावधी डॉलर्स लागतील.' पण, बोयानने हे 'अशक्य' शब्द स्वीकारले नाहीत. त्याने एरोस्पेस इंजिनिअरिंगचे आपले उच्च शिक्षण अर्धवट सोडले आणि समुद्राच्या स्वच्छतेसाठी स्वतःला वाहून घेतले. वयाच्या १८ व्या वर्षी (२०१३ मध्ये) बोयानने 'द ओशन क्लीनअप' नावाच्या संस्थेची स्थापना केली. त्याने एक अभिनव विचार मांडला : 'समुद्रातील कचरा शोधण्यासाठी आपण स्वतः फिरण्यापेक्षा समुद्राच्या नैसर्गिक प्रवाहांचा वापर करून कचरा आपल्याकडे कसा येईल?' त्याने एक 'पॅसिव्ह क्लीनअप सिस्टीम' तयार केली. यात समुद्राच्या पाण्यावर तरंगणारे मैलोन्‌ मैल लांब तरंगणारे पाईप्स बसवले जातात. समुद्राच्या लाटांसोबत वाहून येणारा प्लास्टिक कचरा या पाईप्समध्ये अडकतो आणि एका ठिकाणी जमा होतो. तिथून मोठ्या जहाजांच्या मदतीने हा कचरा बाहेर काढून त्याचा पुनर्वापर केला जातो. त्याने लोकांकडून पैसे जमा करून आणि सोशल मीडियाच्या माध्यमातून निधी उभारला. २०१८ मध्ये त्याने उभारलेली यंत्रणा महासागरात यशस्वीपणे तैनात करण्यात आली. या सिस्टीमने समुद्रातील टनभर प्लास्टिक गोळा करण्यास सुरुवात केली. समुद्र स्वच्छ करताना बोयानच्या लक्षात आले की, महासागरात जाणारा ८० टक्के प्लास्टिक कचरा हा जगातील केवळ १,००० नद्यांमधून येतो. आपण नद्यांमध्येच प्लास्टिक अडवले, तर ते समुद्रात पोहोचणारच नाही. यासाठी त्याने 'द इंटरसेप्टर' नावाचे एक सौरऊर्जेवर चालणारे स्वयंचलित जहाज तयार केले. हे जहाज नदीच्या प्रवाहात उभे राहते आणि वाहत येणारा सर्व कचरा एका कन्व्हेयर बेल्टच्या मदतीने स्वतःमध्ये खेचून घेते. आज जगातील अनेक प्रदूषित नद्यांमध्ये (अगदी भारतातील काही नद्यांमध्येही) ही सिस्टीम वापरली जात आहे. मासेमारी व्यवसायातूनदेखील मोठ्या प्रमाणात कचरा निर्माण होत असल्याचे त्याच्या निदर्शनास आले. बोयानच्या टीमने आतापर्यंत १०० हून अधिक वैज्ञानिक शोधनिबंध प्रसिद्ध केले आहेत. नुकतेच त्यांनी हवाई बेटांवरून जप्त केलेल्या २०,००० हून अधिक ईल ट्रॅप्सचा (सापळ्यांचा) अभ्यास केला. या संशोधनाचा वापर आता जगभरातील देशांना मासेमारीचे कडक कायदे बनवण्यासाठी केला जाणार आहे. २०४० पर्यंत महासागरांमधील ९० टक्के तरंगणारे प्लास्टिक नष्ट करण्याचे त्याचे उद्दिष्ट आहे. बोयानच्या संस्थेत जगभरातील शेकडो वैज्ञानिक आणि इंजिनिअर्स काम करत आहेत. त्याला संयुक्त राष्ट्राचा सर्वोच्च पर्यावरण पुरस्कार 'चॅम्पियन्स ऑफ द अर्थ'देखील मिळाला आहे.

# आरक्षणातील उपवर्गीकरण..महारांना भीती नक्की कशाची..?

सध्या महाराष्ट्र राज्यात दलितांसाठी असलेलं जातीय आरक्षण १३% आहे. म्हणजे महार, चांभार, मांग, ढोर आदी ५९ जातींना सरकारी नोकऱ्यांत व शिक्षणात १३% जागा आरक्षित असाव्यात.आरक्षणाचं उपवर्गीकरण झाल्यास महार जे एकूण दलितांच्या ६०% आहेत त्यांच्या साठी आरक्षण होईल ७.८% आणि मांग जे एकूण दलितांच्या १९% आहेत त्यांच्या साठी आरक्षण होईल २.५% अर्थात महारांना मिळणारं आरक्षण १३% हून ७.८% म्हणजे ५.२ टक्क्यांनी घटेल तर मांग जाती साठी उपलब्ध आरक्षण हे १३% हून २.५% अर्थात १०.५ टक्के एवढ्या मोठ्या प्रमाणात (महारांच्या दुप्पटीने) घटेल..याचा अर्थ आरक्षणाचं उपवर्गिकरण झाल्यास, राखीव जागांच्या संख्येबाबत, महारांपेक्षा मांगांचे कैकपटीने अधिक नुकसान दिसत आहे..

मात्र असं असतांनाही उपवर्गीकरण करण्यास मांग विरोध करत नाहीत उलटपक्षी उपवर्गीकरणाच्या बाजून लढताहेत.असं का?? एकूण १३% आरक्षण असतांनाही आपल्या वाट्याला आपल्या हक्काचे २.५% देखिल आपल्या जातीला मिळत नाहीये.त्यामुळे उपवर्गिकरण झाल्यास आपले स्वतःचे २.५% तरी आपल्याला भेटणारच व त्यात कोणीही इत्तर हिस्सेदार असणार नाही अशी जर मांग जातीची धारणा झाली असल्यास त्यांच्या या भावनेकडे दुर्लक्ष करत त्यांना अखंड दलित समाज हा एकजिनसी आहे.RSS आपल्यात फूट पाडत आहे.म्हणून उपवर्गीकरण चुकीचं.वगैरे वगैरे बोगस डोस पाजणं निव्वळ निरर्थकच.. RSS ने खुद्द महार/बौद्धांत उभी-आडवी-तिरपी फूट पाडलीय..भारतीय बौद्ध महासभेच्या नेत्यांसोबत RSS मधील मजूर महारांचा मुक्त वावर... रिपाइं नेत्यांचं RSS धार्जिण्या पक्षांसोबत राजकिय शैय्यासोबत... दीक्षाभूमी... क्रांतीभूमी...नागसेन वन इत्यादी ठिकाणी RSS वाल्यांसाठी 'आओ जावो घर तुम्हारा..' अशी एकूण परिस्थिती अन ती गपगुमान सहन करणारा महार/बौद्ध समाज हे दळभद्री वास्तव समोर स्वच्छपणे दिसत असतांना, 'RSS हे मांग अन महार जातीत फूट पाडत आहे..' या कोल्हेकुईला मांग जात गंभीरपणे घेईल असं समजणं मूर्खपणाचं होय..

तसंही जात ही मुळात विभाजनकारी असते.ती माणसांना एकसंघ/एकजिनसी राहूच देत नाही.ती माणसात सदैव फूट पाडत असते.महार जातीतल्या अनेक पोटजाती अन खैरलांजी सारख्या अत्यंत भयानक हत्याकांडात देखिल विदर्भातील महार पोटजातींनी एकमेकांशी टिकवून धरलेलं वैमनस्य याचं जिवंत उदाहरण.यासाठीच तर बाबासाहेबांनी जात गाडण्यास प्राधान्य दिलं होतं. जात सुटली.जातीव्यवस्था तुटली तरंच समाज एकसंघ होईल अन्यथा RSS सारख्या ब्राह्मण्यवादी संघटना आपली 'पोळी शेकण्यासाठी' जातींचा दुरुपयोग तर करून घेणारच यात नवल तरी काय.म्हणून आपलं 'महारपण' शाबुत राखत अखंड दलित एकजिनसी/एकसंघ असल्याचा भंपकपणा करण्याचं सोडून उपवर्गीकरण करण्यास टिपेचा विरोध करणाऱ्या महार/बौद्ध विचारवंतानी,आरक्षणाच्या लाभार्थींची खरी टक्केवारी समोर आणावी.यात जर मांग जातीला २.५% पेक्षा अधिक आरक्षणाचा लाभ मिळत असल्याचं निदर्शनास आलं तर त्यांना पटवून देणं सोप्प जाईल की आरक्षणात उपवर्गीकरण झाल्यानं त्यांचंच नुकसान होणार अन सध्या त्यांना २.५ टक्क्यांहून जास्त मिळत असलेलं प्रतिनिधित्व घटून ते २.५ टक्क्यांवर बंदिस्त केलं जाईल. जातीय आरक्षणातील उपवर्गीकरणाचा तिढा सोडविण्याचा हाच एक सुटसुटीत अन सशक्त असा मार्ग..

पण तरीही मांग जातीने ऐकलं नाहीच तर हरियाणा, तामिळनाडू येथील उपवर्गीकरणात जसे दलितांमध्ये दोन वर्ग केलेत तसेच आपल्याकडेही मांग जातीचा २.५% आरक्षण असलेला गट - आणि उरलेलं १०.५% आरक्षण असलेला उरलेल्या ५८ जातींचा गट इ असं उपवर्गीकरण करता येईल.मात्र हे तेंव्हाच शक्य होईल जेंव्हा आरक्षणातील लाभार्थी जातींची खरी आकडेवारी सायंटिफिकरित्या समोर आणली जाईल...पण आरक्षणासाठी चक्क बौद्ध धम्म बाटवायला निघालेले 'महान' महार-हरिजन अशी आकडेवारी समोर आणण्यास धजावतील का तरी? कारण या आकडेवारीत स्वतः महारांना त्यांच्या संख्याबळ (७.८%) पेक्षा अधिक आरक्षण सातत्यानं मिळाल्याचं समोर आल्यास, हातात जे वाढीव आरक्षण आहे ते जाऊन आपल्याला ७.८ टक्क्यांवर बंदिस्त केलं जाईल याची भीती त्यांना लागली नसावी हे कशाहून?? म्हणून उपवर्गीकरण झाल्यानं आरक्षणातील आपल्या महारकीची टक्केवारी घसरू नये, यासाठी ठडड च्या नावानं बोटं मोडत उपवर्गीकरणाला आत्यंतिक विरोध चालवलेला दिसतोय महार-हरिजनांनी.आरक्षण संपल्यात जमा असलं तरी एव्हढं-तेव्हढं इवलसं जेव्हढं उरलंय त्यातही आपली टक्केवारी कमी होऊ नये हीच महारांची खरी भीती.बाकी जातिभेदाने बरबटलेल्या समाजात,सर्व जातींना आरक्षणात समान संधी उपलब्ध असावी या संधीचा लाभ घेत त्यांनी पुढे येत.एक दिवस या जातीलाच लाथाडावं या अर्थाने उपवर्गीकरणाची सैद्धांतिक गरज वगैरेचा अभ्यास गेला उडत..

मिलिंद भवार पँथर्स
९८३३८३००२९

# देव, दारिद्र्य आणि समाजव्यवस्था : भीक मागणारा माणूस मंदिराबाहेरच का दिसतो?

भारतीय समाजात धर्म, श्रद्धा आणि देवस्थाने यांना अनन्यसाधारण महत्त्व आहे. गावोगावी उभ्या असलेल्या मंदिरांच्या उंच शिखरांपासून ते महानगरांतील भव्य देवालयांपर्यंत भक्तीचा अखंड प्रवाह वाहताना दिसतो. लाखो-कोट्यवधी रुपयांच्या देणग्या, सोन्या-चांदीचे मुकुट, महाप्रसाद, उत्सव आणि यात्रांमधून श्रद्धेचे वैभव अनुभवायला मिळते. परंतु या वैभवाच्या सावलीत एक वेदनादायी वास्तव कायम उभे असते, मंदिराच्या पायरीवर बसलेला भिकारी, देवाच्या दर्शनासाठी आलेल्या भक्तांच्या रांगा आणि त्याच देवाच्या दारात उपाशीपोटी मदतीची याचना करणारा माणूस यांच्यातील विरोधाभास समाजाच्या अंतरंगावर अनेक प्रश्नचिन्हे निर्माण करतो. आज भारत जगातील सर्वात वेगाने विकसित होणाऱ्या अर्थव्यवस्थांपैकी एक मानला जातो. अवकाश संशोधन, तंत्रज्ञान, उद्योग आणि पायाभूत सुविधांच्या क्षेत्रात देशाने मोठी झेप घेतली आहे. पण या विकासाच्या झगमगाटामागे अजूनही लाखो लोक दारिद्र्य, उपासमार आणि बेरोजगारीशी झुंज देत आहेत. मंदिरांच्या गाभाऱ्यांमध्ये सुवर्णमंडित देवता दिसतात, पण मंदिराबाहेरच्या रस्त्यावर अन्नासाठी हात पसरलेली माणसेही दिसतात. ही केवळ आर्थिक विषमता नाही, ही सामाजिक संवेदनशीलतेची परीक्षा आहे.

धर्म माणसाला नैतिकता, करुणा आणि परोपकाराची शिकवण देतो. प्रत्येक धर्म मानवसेवेला सर्वोच्च स्थान देतो. मग देवाचे दर्शन घेऊन बाहेर पडणारा भक्त मंदिराच्या पायरीवर बसलेल्या वृद्धाकडे, अपंगाकडे किंवा उपाशी मुलाकडे दुर्लक्ष का करतो? देवाला लाखो रुपयांचे दान देताना समाज उदार असतो, पण एखाद्या गरिबाच्या शिक्षणासाठी, उपचारासाठी किंवा पुनर्वसनासाठी त्याच उदारतेने पुढे येतो का? हा प्रश्न धर्माचा नाही, तो मानवी संवेदनांचा आहे. भारतातील अनेक प्रसिद्ध देवस्थानांकडे प्रचंड आर्थिक संसाधने आहेत. भक्तांच्या श्रद्धेतून निर्माण झालेली ही संपत्ती नक्कीच पवित्र आहे. परंतु त्या संपत्तीचा काही भाग समाजातील दुर्बल घटकांच्या उन्नतीसाठी, शिक्षणासाठी, आरोग्यासाठी आणि रोजगारनिर्मितीसाठी अधिक व्यापकपणे वापरला गेला, तर त्यातून श्रद्धेचे सामाजिक सामर्थ्य अधिक प्रभावीपणे दिसून येईल. कारण देवाला अर्पण केलेली संपत्ती शेवटी माणसाच्या कल्याणासाठीच उपयोगी पडली, तरच तिचे खरे सार्थक होईल. दारिद्र्य हा कोणत्याही व्यक्तीचा अपराध नसतो. तो अनेकदा सामाजिक, आर्थिक आणि शैक्षणिक विषमतेचा परिणाम असतो. शिक्षणाचा अभाव, रोजगाराच्या मर्यादित संधी, ग्रामीण भागातील असमान विकास, अपुरी सामाजिक सुरक्षा आणि




वाढती महागाई यांमुळे अनेकांना जगण्यासाठी संघर्ष करावा लागतो. अशा परिस्थितीत भीक मागणारा माणूस हा केवळ एक व्यक्ती नसतो; तो समाजव्यवस्थेच्या अपयशाचा जिवंत पुरावा असतो.

समाजसुधारकांनी आणि विचारवंतांनी याच प्रश्नांवर सातत्याने भाष्य केले आहे. महात्मा फुले यांनी शिक्षणाला सामाजिक परिवर्तनाचे साधन मानले. राजर्षी शाहू महाराजांनी वंचितांना संधी देण्याचा मार्ग दाखविला. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी शिक्षण, संघटन आणि संघर्षाचा मंत्र दिला. त्यांनी माणसाच्या स्वाभिमानाला सर्वोच्च स्थान दिले. त्यांच्या विचारांचा केंद्रबिंदू हा माणूस होता. समाजातील शेवटच्या घटकाला न्याय मिळाल्याशिवाय प्रगती पूर्ण होऊ शकत नाही, हा त्यांचा संदेश आजही तितकाच महत्त्वाचा आहे. श्रद्धा ही माणसाच्या आयुष्याचा आधार असते. संकटात सापडलेल्या अनेकांना मंदिर, मशिद, गुरुद्वारा किंवा चर्च यांमधून मानसिक बळ मिळते. त्यामुळे धर्म किंवा श्रद्धेवर टीका करणे हा या चर्चेचा उद्देश नाही. उलट श्रद्धा आणि सामाजिक जबाबदारी यांचा सुंदर संगम घडविणे हा हेतू आहे. मंदिरातील घंटानादाबरोबरच समाजातील उपाशी पोटांचा आवाजही ऐकू येणे आवश्यक आहे. भक्ती आणि मानवता यांच्यातील दुवा अधिक मजबूत झाला पाहिजे.

आज दानधर्माच्या संकल्पनेलाही नव्याने समजून घेण्याची गरज आहे. भिकाऱ्याच्या हातावर काही नाणी ठेवणे ही तात्पुरती मदत असू शकते, पण त्याला शिक्षण, कौशल्य प्रशिक्षण आणि रोजगाराची संधी उपलब्ध करून देणे ही कायमस्वरूपी मदत ठरते. एखाद्या विद्यार्थ्याची फी भरणे, एखाद्या रुग्णाच्या उपचारासाठी मदत करणे, एखाद्या कुटुंबाला स्वावलंबी बनविणे किंवा एखाद्या युवकाला रोजगार उपलब्ध करून देणे हीच खरी समाजसेवा आहे. अशा कृतींमध्ये धर्माचा आत्मा अधिक जिवंत दिसतो. भारतीय संतपरंपरेनेही हाच संदेश दिला आहे. संत तुकारामांनी दया आणि करुणेला महत्त्व दिले. संत कबीरांनी बाह्य आडंबरांपेक्षा अंतःकरणाच्या शुद्धतेवर भर दिला. संत गाडगेबाबांनी स्वच्छता, शिक्षण आणि मानवसेवा यांनाच खरी पूजा मानले. त्यांनी मंदिरांपेक्षा समाजातील दुःख दूर करण्याला अधिक महत्त्व दिले. आजच्या काळात त्यांच्या विचारांची गरज अधिक तीव्रतेने जाणवते.

समाज म्हणून आपण अनेकदा धार्मिकतेचे प्रदर्शन करतो, परंतु मानवतेची खरी परीक्षा आली की मागे पडतो. उत्सवांमध्ये लाखो रुपये खर्च होतात, पण शेजारी राहणाऱ्या गरजू कुटुंबाच्या अडचणींकडे दुर्लक्ष केले जाते. भव्य मिरवणुका काढल्या जातात, पण रस्त्यावर पडलेल्या जखमी व्यक्तीला मदत करण्यासाठी अनेकजण थांबत नाहीत. धर्माचा खरा अर्थ जर करुणा, दया आणि सेवा असेल, तर या मूल्यांचे प्रतिबिंब आपल्या कृतीत दिसणे आवश्यक आहे.

मंदिराबाहेर बसलेला भिकारी हा समाजाला प्रश्न विचारतो तुमच्या विकासात माझे स्थान कुठे आहे? तुमच्या श्रद्धेने माझ्या जीवनात काय बदल घडवला? माझ्या मुलालाही शिक्षण, रोजगार आणि सन्मानाचे जीवन मिळणार आहे का? या प्रश्नांची उत्तरे केवळ भाषणांमध्ये किंवा तत्त्वज्ञानात नाहीत, ती आपल्या सामाजिक धोरणांमध्ये, प्रशासनाच्या कार्यक्षमतेत आणि नागरिकांच्या संवेदनशीलतेत दडलेली आहेत. आज देशाला अधिक भव्य मंदिरांइतकीच गरज अधिक सक्षम माणसे घडविण्याची आहे. अधिक सोन्याचे कळस उभारण्याबरोबरच अधिक शाळा, वसतिगृहे, रुग्णालये, कौशल्य विकास केंद्रे आणि रोजगारनिर्मितीची साधने उभी राहिली पाहिजेत. श्रद्धा आणि विज्ञान, धर्म आणि सामाजिक न्याय, पूजा आणि सेवा यांचा समतोल साधला गेला तरच विकासाला खरे मानवी रूप प्राप्त होईल. विकासाचे मोजमाप केवळ जीडीपी, महामार्ग किंवा उंच इमारतींनी होत नाही. समाजातील सर्वात दुर्बल व्यक्ती किती सन्मानाने जगते, यावरच कोणत्याही राष्ट्राची खरी प्रगती अवलंबून असते.

मंदिराबाहेर भीक मागणारा माणूस दिसत असेपर्यंत समाजाच्या प्रगतीचे दावे अपूर्णच राहतील. कोणत्याही सभ्य समाजाची महानता त्याच्या मंदिरांच्या उंचीने किंवा संपत्तीने ठरत नाही; ती समाजातील सर्वात दुर्बल व्यक्तीच्या जीवनातील सन्मानाने ठरते. देवावर श्रद्धा ठेवणे हा प्रत्येकाचा वैयक्तिक अधिकार आहे; पण माणसावर प्रेम करणे आणि त्याच्या सन्मानासाठी उभे राहणे ही प्रत्येकाची सामाजिक जबाबदारी आहे. शेवटी प्रश्न देवाचा नाही, तर माणुसकीचा आहे. मंदिरातील देवापर्यंत पोहोचण्यापूर्वी मंदिराबाहेर बसलेल्या माणसापर्यंत आपण पोहोचलो, तरच समाज अधिक न्याय्य, संवेदनशील आणि समतामूलक बनेल. त्या दिवशी मंदिराच्या पायरीवरची भीक कमी होईल आणि मानवतेची श्रीमंती अधिक वाढेल. हाच खऱ्या अर्थाने धर्माचा विजय आणि समाजव्यवस्थेच्या यशाचा मापदंड ठरेल. मंदिरातील देवापर्यंत पोहोचण्याची घाई आपण नेहमीच करतो, पण मंदिराबाहेर बसलेल्या माणसापर्यंत पोहोचण्याची संवेदना किती जपतो, हा खरा प्रश्न आहे. कारण धर्माचे अंतिम ध्येय देवापर्यंत पोहोचणे नसून माणुसकीपर्यंत पोहोचणे हेच असते. मंदिराच्या पायरीवरची भीक संपली आणि प्रत्येक हाताला काम, प्रत्येक पोटाला अन्न व प्रत्येक व्यक्तीला सन्मान मिळाला, तर तोच समाजव्यवस्थेचा खरा विजय आणि श्रद्धेचा सर्वोच्च उत्सव ठरेल.



**प्रवीण बागडे**
नागपूर
मो.क्र. ९९२३६२०९१९

## 'युवा संगम' कार्यक्रमांतर्गत राज्यपालांनी साधला विद्यार्थ्यांशी संवाद

**मुंबई/प्रतिनिधी :** महाराष्ट्राचे राज्यपाल जिष्णु देव वर्मा यांनी सोमवारी (दि. ८) आंध्रप्रदेशातील विद्यार्थी प्रतिनिधींसोबत 'युवा संगम' कार्यक्रमांतर्गत लोकभवन, मुंबई येथे संवाद साधला. हा कार्यक्रम भारतीय विज्ञान शिक्षण व संशोधन संस्था पुणे तर्फे आयोजित करण्यात आला होता. एक भारत श्रेष्ठ भारत उपक्रमाचा महत्त्वपूर्ण भाग म्हणून कार्यक्रमाचे आयोजन केले होते.

यावेळी राज्यपालांनी आपल्या भाषणात जबाबदारी, विनम्रता आणि सामाजिक सहभाग या मूल्यांचे महत्त्व अधोरेखित केले. त्यांनी विद्यार्थ्यांना विविधतेचा स्वीकार करण्याचे, शिस्त व चिकाटीने काम करण्याचे तसेच व्यावसायिक उत्कृष्टतेसोबत सामाजिक जबाबदारी पार पाडण्याचे आवाहन केले.

राज्यपालांनी शिक्षण सुधारणा, कौशल्य विकास, संशोधन आणि आरोग्य क्षेत्रातील प्रगतीचे महत्त्व देखील अधोरेखित केले. त्यांनी शिक्षण मंत्रालय व सहभागी संस्थांचे अभिनंदन करून विद्यार्थ्यांना उज्वल भविष्यासाठी शुभेच्छा दिल्या.

यावेळी केंद्रीय उच्च शिक्षण विभागचे उपसचिव श्रेयांश मोहन, भारतीय विज्ञान शिक्षण व संशोधन संस्था () पुणे येथील प्रसार व प्रशिक्षण कार्यक्रम वरिष्ठ तांत्रिक अधिकारी डॉ. मनवा दिवेकर तसेच वरिष्ठ प्रधान तांत्रिक अधिकारी डॉ. शांती कलीपटनपू, तिरुपती येथील भारतीय तंत्रज्ञान संस्थेतील मानव व सामाजिक विज्ञान विभागाच्या सहाय्यक प्राध्यापिका डॉ. बिभूती कच्छप, राज्यपालांचे सचिव डॉ. प्रशांत नारनवरे, राज्यपालांचे सहसचिव एस. रामामूर्ती, आयआयएसईआर येथील प्रसार व प्रशिक्षण कार्यक्रम प्रकल्प व्यवस्थापक नितीन तिवाणे, आंध्रप्रदेशातील विद्यार्थी प्रतिनिधी मंडळाचे सदस्य, आयसरचे कर्मचारी व विद्यार्थी उपस्थित होते.

## अभिनेता जावेद जाफरीच्या पत्नीची १६.२४ कोटींची फसवणूक; बीएमसीच्या सहाय्यक आयुक्ताचे निलंबन

**मुंबई/प्रतिनिधी :** बॉलिवूड अभिनेता जावेद जाफरीच्या पत्नी हबीबा जाफरी यांची तब्बल १६ कोटी २४ लाख रुपयांची फसवणूक झाल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. या प्रकरणात मुंबई महापालिकेच्या के-नॉर्थ विभागाचे सहाय्यक आयुक्त महेश पाटील यांच्यासह सहा जणांविरोधात खार पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. गुन्हा दाखल झाल्यानंतर महापालिकेने महेश पाटील यांना निलंबित करण्यात आले आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, बांद्यातील एका पुनर्विकास प्रकल्पात गुंतवणूक केल्यास मोठा आर्थिक फायदा होईल, असे आमिष हबीबा जाफरी यांना दाखवण्यात आले होते. या व्यवहारासाठी बनावट कागदपत्रांचा वापर करण्यात आल्याचा आरोप आहे. या कथित फसवणुकीत हबीबा जाफरी यांचे १६.२४ कोटी रुपयांचे नुकसान झाल्याची तक्रार करण्यात आली आहे.

या प्रकरणाची गंभीर दखल घेत बृहन्मुंबई महानगरपालिकेने महेश पाटील यांच्यावर निलंबनाची कारवाई केली. शुक्रवारी निलंबनाचा आदेश जारी करण्यात आला असून रविवारी तो बजावण्यात आल्याची माहिती समोर आली आहे.

# पारगाव टोल नाक्या जवळ भरधाव ट्रकने २ मोटार स्वरांना चिरडले! रस्त्यावर रक्त आणि मासाचा चिखल!

## दुर्दैवी घटनेत २ नागरिकांचा जागीच मृत्यू!; घटनेची माहिती परिसरात कळताच हळहळ व्यक्त

**वाशी/प्रतिनिधी:** धाराशिव जिल्ह्यातील वाशी तालुक्यातील पारगाव टोल नाक्याजवळ दोन मोटरसायकल स्वरांना एका ट्रकने चिरडले सदरील घटनेमध्ये दोन्ही नागरिकांचा जागीच मृत्यू झाल्याची दुर्दैवी घटना घडली आहे.

प्राथमिक मिळालेली माहिती अशी की, वाशी तालुक्यातील पारगाव येथील टोल नाक्याजवळ रविवार दिनांक ७ रोजी दुपारी २-०० वाजण्याच्या दरम्यान भरधाव वेगात येत असलेल्या एका ट्रकने दोन मोटरसायकल स्वरांना चिरडले असून या घटनेमध्ये दोघांचाही जागीच मृत्यू झाल्याची प्राथमिक माहिती मिळाली आहे.

आबासाहेब निवृत्ती खराडे वय ३८ वर्षे रा. शेलगाव ता. वाशी जि. धाराशिव आणि माऊली साठे वय ४० वर्षे रा.सोन्नेवाडी ता. भूम जि. धाराशिव असे मृतांची नावे आहेत. माऊली साठे यांना बीड येथील जिल्हा रुग्णालयात उपचारासाठी नेण्यात आले. परंतु डॉक्टरांनी तपासणी केली असता त्यांचा मृत्यू झाल्याचे घोषित केले. तर आबासाहेब खराडे यांना वाशी येथील उपजिल्हा रुग्णालय येथे उपचारासाठी देण्यात आले असता डॉक्टरांनी तपासणी करून त्यांना मयत घोषित केले. सदरील घटनेची माहिती परिसरात कळतात हळहळ व्यक्त करण्यात येत असून सदरील घटनेचा पुढील तपास हा वाशी पोलीस स्टेशनचे पोलीस हे करत आहेत.

# जिल्हा परिषद शाळेत प्रवेश घेतल्यानंतर कर माफ- ॲड.प्रविण मेटे



**केज/प्रतिनिधी :** केज तालुक्यातील राजेगाव येथील ग्रामपंचायत कार्यालयात ग्रामपंचायत राजेगाव चे सरपंच सौ. सुशीला मस्के यांच्या अध्यक्षतेखाली मासिक बैठक घेण्यात आली असून सदर मासिक बैठक मध्ये उपसरपंच ॲड.प्रविण मेटे यांनी असे सुचवले की यावर्षी जून महिन्यात जिल्हा परिषद प्राथमिक शाळा राजेगाव येथे जो कोण विद्यार्थी १ ते ४ जिल्हा परिषद प्राथमिक शाळेमध्ये नवीन प्रवेश घेईल त्या विद्यार्थ्याच्या कुटुंबीयाला ग्रामपंचायत राजेगाव एक वर्ष कुठलाही कर आकारणार नाही हा ठराव घेण्यामागचा प्रामाणिक हेतू असा आहे की आपल्या गावची वैभव असलेली जिल्हा परिषद प्राथमिक शाळा ही व्यवस्थित चालावी व विद्यार्थ्याला शैक्षणिक सामाजिक सर्व गोष्टीचा ज्ञान मिळावे व जिल्हा परिषद शाळेमध्ये जास्तीत जास्त प्रवेश व्हावेत हा या मागचा हेतू आहे. तसेच या ठरावासाठी सर्व सदस्यांनी एक मुखाने होकार देण्यात आला.तरी सर्व राजेगावकरांना विनंती की आपल्या पाल्यांचे आपल्या गावच्या जिल्हा परिषद शाळेमध्ये प्रवेश घ्यावेत ही विनंती ॲड.प्रवीण मेटे उपसरपंच राजेगाव यांनी सर्व गांवात पालकांना आव्हान केले आहे.

# साबला येथे शिवराज्याभिषेक दिन मोठ्या उत्साहात साजरा




**केज/प्रतिनिधी :** केज तालुक्यातील साबला येथील ग्रामपंचायत कार्यालय यांच्या वतीने प्रथम सरपंच जनाबाई नरहरी काकडे यांच्या हस्ते राजमाता जिजाऊ माँ साहेब व छत्रपती शिवाजी महाराज''यांच्या प्रतिमेचे पूजन करून राष्ट्रगीत,महाराष्ट्र गीत घेऊन.

शिवराज्याभिषेक दिन साजरा करण्यात आला. यावेळी समाजसेवक नरहरी काकडे,युवासेना ( शिंदेगट ) तालुका प्रमुख दत्तकुमार काकडे,जालिंदर मुळे, गणेश कटारे, विशाल काकडे, गुलाब मुळे, माऊली नाईकनवरे, श्रीमंत नाईकनवरे, राजेभाऊ काकडे, महादेव काकडे, सुरेश शिंदे, बाबासाहेब शिंदे, बाळासाहेब काकडे, धनंजय नाईकनवरे, विष्णू काकडे, रुस्तुम मस्के, अशोक पांचाळ, दशरथ कटारे,आत्माराम काकडे, अंगद काकडे, धनंजय नाईकनवरे, साहेबराव काकडे, गोरख कटारे, सुरेश नाईकनवरे, विठ्ठल काकडे, अशोक काकडे, सतिश नाईकनवरे, विजय नाईकनवरे, आप्पा काकडे, आश्रुबा नाईकनवरे फोटो ग्रापर राहुल मुळे,नितिन काकडे इत्यादी शिवप्रेमी, शिवभक्त यांच्या उपस्थितीत छत्रपती शिवाजी महाराज यांचा शिवराज्याभिषेक दिन कार्यक्रम साजरा करण्यात आला.

# विज्ञानाशी सुसंगत असेल तेच बुद्धाचे तत्त्वज्ञान समजावे : बी. बी. मेश्राम

## फुले शाहू आंबेडकराईट स्टडी फाउंडेशनची १७४ वी शतकोत्तर मोफत वैचारिक प्रबोधनात्मक साप्ताहिक कार्यशाळा संपन्न



**छत्रपती संभाजीनगर/प्रतिनिधी :** फुले शाहू आंबेडकराईट स्टडी फाउंडेशन व दि ऑल इंडिया नाग संघ यांच्या संयुक्त विद्यमाने अस्पृश्यांना बौद्ध धर्माशिवाय दुसरा कोणताही अभ्युदयाचा मार्ग नाही. या डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या ऐतिहासिक विधानावर आधारित १७४ वी शतकोत्तर मोफत वैचारिक प्रबोधनात्मक साप्ताहिक कार्यशाळा संस्थेच्या साकेतनगर येथील कार्यालयात ७ जून २०२६ ला उत्साहात संपन्न झाली.

कार्यशाळेच्या अध्यक्षस्थानी फुले शाहू आंबेडकराईट स्टडी फाउंडेशनचे संचालक बी. बी. मेश्राम होते. अध्यक्षीय मार्गदर्शन करताना त्यांनी सांगितले की, २५ मे ते ६ जून १९५० या कालावधीत सिलोन बुद्धिस्ट काँग्रेसद्वारे आयोजित जागतिक बुद्ध परिषदेत भारताचे प्रतिनिधी म्हणून तत्कालीन कायदामंत्री डॉ. बाबासाहेब आंबेडकर सहभागी झाले होते. या परिषदेत त्यांनी बौद्ध धर्माचा इतिहास, त्याचा अस्त व उदय, नैतिक मूल्यांचे महत्त्व, ब्राह्मणी धर्माला बौद्ध धर्माने दिलेले आव्हान तसेच अस्पृश्यांच्या उन्नतीसाठी बौद्ध धर्माचे अनन्यसाधारण महत्त्व याविषयी सखोल विवेचन केले होते.

बी. बी. मेश्राम पुढे म्हणाले की, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे बौद्ध धर्मावरील विचार समजून घेण्यासाठी पी. लक्ष्मी नरसू लिखित इसेन्स ऑफ बुद्धिझम या ग्रंथाला त्यांनी लिहिलेली प्रस्तावना अभ्यासणे आवश्यक आहे. बुद्धत्वाचे आचरण करताना एखादी बाब विज्ञानाशी सुसंगत आहे की नाही, याची चिकित्सक तपासणी केली पाहिजे. जे विज्ञाननिष्ठ व तर्कसंगत आहे, तेच बुद्धाचे खरे तत्त्वज्ञान समजावे.

उद्घाटनपर मार्गदर्शन करताना ॲड. राहुल गायकवाड यांनी जातीव्यवस्था टिकवून ठेवण्यासाठी समाजात आंतरजातीय विवाहांना विरोध करण्यात आला आणि त्यातून अनेक सामाजिक अनिष्ट प्रथा उदयास आल्या, असे सांगितले. समाजात परस्पर स्नेह, समता व मानवता वृद्धिंगत करणारे आचरण प्रत्येकाने स्वीकारले पाहिजे, असे त्यांनी प्रतिपादन केले.

प्रमुख वक्त्या डॉ. कल्पना गंगावणे यांनी बुद्धांचे व्यक्तिमत्त्व इतर धर्मसंस्थापकांपेक्षा कसे वेगळे होते? हे समजून घेण्याची आवश्यकता व्यक्त केली. अत्त दीप भव या तत्त्वानुसार ध्यान साधना व आत्मपरिष्कार केल्यास बुद्धत्वाकडे वाटचाल करता येते, असे त्या म्हणाल्या. समाजातील नेतृत्वाच्या अभावाकडे लक्ष वेधत त्यांनी प्रत्येकाने नियमितपणे बुद्ध विहारात जाऊन सामाजिक व वैचारिक बांधिलकी जोपासावी, असे आवाहन केले.

यावेळी समन्वयक उद्योजक शशिकांत काळे यांनी बौद्ध धर्माचे आचरण आणि सामाजिक ऐक्य यांचे महत्त्व अधोरेखित केले. उपवर्गीकरणाच्या पार्श्र्वभूमीवर विविध घटकांमध्ये वाढणारी द्वेषभावना समाजहितासाठी घातक असल्याचे त्यांनी नमूद केले. राज गायकवाड यांनी समाजातील पाखंडवाद नष्ट करण्यासाठी कार्य करण्याचे आवाहन केले. अर्चित मेश्राम यांनी अधिक अभ्यासपूर्वक विचार मांडण्याचा संकल्प व्यक्त केला. ॲड. डी. बी. मेश्राम यांनी विनयपिटक, सुत्तपिटक व अभिधम्मपिटक यांच्या अभ्यासातील विसंगती दूर करण्याची गरज व्यक्त केली.

कार्यक्रमाच्या प्रारंभी महापुरुषांच्या प्रतिमांना पुष्प व पुष्पमाला अर्पण करून मान्यवरांचे स्वागत करण्यात आले. प्रास्ताविक उद्योजक प्रा. विलास कटारे यांनी केले. सूत्रसंचालन ॲड. विलास रामटेके यांनी तर आभार प्रदर्शन उद्योजक शशिकांत काळे यांनी केले. कार्यशाळेस विविध क्षेत्रांतील अभ्यासक, सामाजिक कार्यकर्ते व प्रतिनिधी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# संजय भारुका यांच्या मार्गदर्शनाखाली जागतिक पर्यावरण दिनानिमित्त पर्यावरण जनजागृती सायकल रॅली उत्साहात



**लातूर/प्रतिनिधी :** जागतिक पर्यावरण दिनानिमित्त जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, लातूर, लातूर सायकलिस्ट क्लब आणि ''आपले आरोग्य आपलीच जबाबदारी'' यांच्या संयुक्त विद्यमाने पर्यावरण जनजागृती सायकल रॅलीचे आयोजन करण्यात आले. जिल्हा न्यायालय, लातूर येथून सुरू झालेल्या या रॅलीला सायकलप्रेमी, नागरिक आणि विविध क्षेत्रातील मान्यवरांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.

माननीय प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश तथा अध्यक्ष, जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, लातूर संजय भारुका यांच्या मार्गदर्शनाखाली हा उपक्रम पार पडला. पर्यावरण संवर्धन, प्रदूषणमुक्त जीवनशैली आणि निरोगी आरोग्याचा संदेश समाजापर्यंत पोहोचविणे हा रॅलीचा मुख्य उद्देश होता.

कार्यक्रमास जिल्हा न्यायाधीश श्री. राहुल भोसले, मुख्य न्यायदंडाधिकारी सतीश पाटील, व्यंकटेश गिरवलकर (सचिव, जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, लातूर) यांची प्रमुख उपस्थिती लाभली. तसेच अनंत देशमुख, सलीम जमादार, सौ. माधुरी कुलकर्णी, प्रनील आवळे, सौ. अंजली वाघ आणि करण जाधव हे न्यायाधीशही उपस्थित होते.

रॅलीमध्ये लातूर सायकलिस्ट क्लबचे संस्थापक अध्यक्ष सतीश खोबरे, सहाय्यक सचिव विवेक नरहरे, सचिव गणेश हाके, कोषाध्यक्ष श्याम शेटे, उपाध्यक्ष विकास कातपुरे तसेच 'आपले आरोग्य आपलीच जबाबदारी' संस्थेचे संस्थापक संजय राजुळे यांच्यासह मोठ्या संख्येने सायकलपटूंनी सहभाग नोंदविला.

यावेळी मा. श्री. संजय भारुका साहेब यांनी पर्यावरण आणि आरोग्य यांचा परस्परसंबंध स्पष्ट करत नागरिकांना पर्यावरणपूरक जीवनशैली स्वीकारण्याचे आवाहन केले. वाढते प्रदूषण, वृक्षतोड, प्लास्टिकचा अतिवापर आणि रासायनिक पदार्थांचा अतिरेकी वापर यामुळे पर्यावरणाचे संतुलन बिघडत असून प्रत्येकाने पर्यावरण संरक्षणासाठी पुढाकार घेणे आवश्यक असल्याचे त्यांनी सांगितले.

रॅलीदरम्यान 'झाडे लावा पर्यावरण वाचवा', 'सायकल चालवा आरोग्य जपा', ''प्लास्टिकमुक्त पर्यावरण घडवा' अशा घोषणांद्वारे पर्यावरण संरक्षणाचा संदेश देण्यात आला. सहभागी नागरिकांनी पर्यावरणपूरक जीवनशैलीचा स्वीकार करण्याचा संकल्प केला.

या कार्यक्रमासाठी जिल्हा विधी सेवा प्राधिकरण कार्यालय, लातूर येथील सर्व कर्मचारी, तसेच वाहतूक नियंत्रण विभाग, लातूरचे पोलिस हवालदार श्री. केंद्रे यांनी विशेष सहकार्य केले.

कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी श्री. व्यंकटेश गिरवलकर, संजय राजुळे, विकास कातपुरे, तसेच संस्थेच्या पदाधिकारी व सदस्यांनी विशेष परिश्रम घेतले.

एक पाऊल पर्यावरणासाठी, एक पाऊल आरोग्यासाठी हा संदेश देत सायकल रॅलीचा समारोप करण्यात आला.

# विदर्भातील शाळा २९ जूनपासून सुरु कराव्यात:शिक्षण राज्यमंत्री डॉ.पंकज भोयर यांची मागणी, मुख्यमंत्र्यांकडून सकारात्मक प्रतिसाद

**वर्धा/प्रतिनिधी :** यंदाच्या उन्हाळ्यात विदर्भाला अभूतपूर्व उष्णतेचा सामना करावा लागला आहे. मे महिन्यापासूनच तापमानाचा पारा सतत ४५ ते ४७ अंश सेल्सिअसच्या आसपास राहिला असून, देशातील सर्वाधिक तापमान नोंदविणाऱ्या शहरांच्या यादीत विदर्भातील अनेक शहरांचा समावेश होता. जून महिन्याची सुरुवात झाल्यानंतरही तापमानात अपेक्षित घट झालेली नसल्याने विद्यार्थ्यांच्या आरोग्याचा प्रश्न गंभीर बनला आहे. या पार्श्र्वभूमीवर राज्याचे शालेय शिक्षण राज्यमंत्री डॉ. पंकज भोयर यांनी विदर्भातील शाळा १५ जून ऐवजी २९ जूनपासून सुरू करण्याची मागणी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे सोमवारी केली.

डॉ. भोयर यांनी मुख्यमंत्री फडणवीस यांना सविस्तर निवेदन सादर करून विदर्भातील सध्याच्या हवामानाची परिस्थिती आणि त्याचा विद्यार्थ्यांवर होणारा परिणाम अधोरेखित केला. लहान मुलांची शारीरिक प्रतिकारशक्ती तुलनेने कमी असल्याने उष्माघात, निर्जलीकरण, डोकेदुखी, चक्कर येणे, थकवा तसेच इतर उष्णताजन्य आजारांचा धोका वाढत असल्याचे त्यांनी नमूद केले. अनेक शहरी व ग्रामीण भागातील शाळांमध्ये पुरेशा प्रमाणात पिण्याचे थंड पाणी, सावलीची व्यवस्था किंवा उष्णतेपासून संरक्षणाची साधने उपलब्ध नसल्याने विद्यार्थ्यांना मोठा त्रास सहन करावा लागू शकतो, असेही त्यांनी स्पष्ट केले.

यावर्षी विदर्भातील नागपूर, चंद्रपूर, अकोला, अमरावती, वर्धा आणि यवतमाळ या जिल्ह्यांमध्ये तापमानाने विक्रमी पातळी गाठली. जून महिन्याच्या पहिल्या आठवड्यातही उष्णतेची तीव्रता कायम असल्याने पालकांमध्ये चिंता व्यक्त होत आहे. हवामानातील बदल आणि विलंबाने होणारे पावसाचे आगमन यामुळे उष्णतेचा कालावधी अधिक लांबला आहे. विद्यार्थ्यांच्या आरोग्याला सर्वोच्च प्राधान्य देत शाळा सुरू करण्याची तारीख पुढे ढकलणे आवश्यक असल्याचे डॉ. पंकज भोयर यांनी स्पष्ट केले. त्यांच्या या मागणीला मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सकारात्मक प्रतिसाद दिला असून, विदर्भातील शाळा २९ जून पासून सुरू करण्यासंदर्भात तातडीने निर्णय घेण्याचे मान्य केले.

शिक्षक संघटना व पालकांकडून शाळा सुरू होण्याची तारीख वाढविण्याबाबत मागील काही दिवसांपासून मागणी होत होती. शिक्षण राज्यमंत्री डॉ. भोयर यांनी या गंभीर प्रश्नाकडे लक्ष देत विद्यार्थ्यांच्या आरोग्याला प्राधान्य देत शाळा सुरू करण्याची तारीख वाढविण्यासाठी घेतलेल्या संवेदनशील भूमिकेचे सर्व स्तरांतून स्वागत होत आहे.

# माजी मंत्री, आमदार अमित देशमुख यांनी खंडापूर येथे गावकऱ्यांशी साधला थेट संवाद

**लातूर/प्रतिनिधी :** लातूर शहराच्या नजीक असलेल्या सर्व गावांमध्ये शहरांप्रमाणेच सर्व प्रकारच्या आधुनिक आणि मूलभूत सोयी-सुविधा पुरवण्यात येतील. गाव ते लातूर शहर आणि मुख्य हायवेला जोडणारे रस्ते तातडीने दुरुस्त करून दळणवळण अधिक सक्षम केले जाईल,'' अशी ग्वाही राज्याचे माजी वैद्यकीय शिक्षण व सांस्कृतिक कार्यमंत्री, लातूर जिल्ह्याचे माजी पालकमंत्री तथा महाराष्ट्र विधिमंडळ काँग्रेस पक्षाचे मुख्य प्रतोद आमदार अमित विलासराव देशमुख यांनी दिली.

लातूर तालुक्यातील खंडापूर येथील काँग्रेस पक्षाचे ज्येष्ठ पदाधिकारी व कार्यकर्ते श्री. कृष्णा कैले यांच्या निवासस्थानी माजी मंत्री, आमदार अमित विलासराव देशमुख यांनी काल शुक्रवारी (दि. ५ जून) सायंकाळी सहकाऱ्यांसह सदिच्छा भेट दिली. या प्रसंगी आयोजित करण्यात आलेल्या बैठकीत त्यांनी खंडापूर ग्रामस्थांशी थेट संवाद साधला आणि गावातील विविध विकासकामांचा सविस्तर आढावा घेतला.

या भेटीदरम्यान आमदार अमित देशमुख यांनी गावात चालू असलेले रस्ते, नाली, वीज, शेतरस्ते आणि पाणीपुरवठा यांसह इतर मूलभूत सुविधांच्या कामांची विस्तृत माहिती घेतली. गावकऱ्यांच्या अडीअडचणी व समस्या प्रत्यक्ष जाणून घेतल्यानंतर, ज्या समस्या तातडीने सोडवणे शक्य आहे, त्यांची वेगळी नोंद घेण्यात आली. तसेच उपस्थित संबंधित विभागाच्या अधिकाऱ्यांना या समस्या तात्काळ मार्गी लावण्याच्या कडक सूचना आमदार देशमुख यांनी केल्या. आगामी काळात गावात राबवायच्या विविध योजनांच्या नियोजना संदर्भात त्यांनी ग्रामस्थांशी सविस्तर चर्चा केली आणि दीर्घकालीन उपयोगाच्या योजनांचे प्रस्ताव तात्काळ दाखल करावेत, असे आवाहनही त्यांनी केले.



या महत्त्वपूर्ण संवाद बैठकीस लातूर शहर जिल्हा काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष प्राध्यापक डॉक्टर शिवाजी जवळगेकर, लातूर पंचायत समितीचे सभापती श्रीकांत बैले, उपसभापती महेश चव्हाण, विलास को-ऑपरेटिव्ह बँकेचे व्हाईस चेअरमन समद पटेल, ट्वेंटीवन शुगरचे व्हाईस चेअरमन विजय देशमुख, तात्यासाहेब देशमुख, राम साळुंखे आणि अक्षय देशमुख यांची प्रमुख उपस्थिती होती.

तसेच संजय पाटील खंडापूरकर, चंद्रशेखर दंडीमे, डॉक्टर सतीश कानडे, भास्कर शिंदे, नारायण ढोरमारे, रमेश थोरमोटे पाटील, केतन कैले, प्रभू कैले, गहिनीनाथ सुडे, नरसिंग बोके, सुरेश जाधव, हंसराज चवळे, पंडितराव लखनगिरे, सुरेश मस्के यांच्यासह ग्रामसेवक बाळासाहेब दुधाटे, कृषिसहायक सोमवंशी, तलाठी दादाराव कांबळे, जिल्हा परिषदेच्या बांधकाम विभागाचे अभियंता एस. आर. स्वामी आणि महावितरणचे शाखा अभियंता एम. डी. तलहा आदी विविध विभागांचे शासकीय अधिकारी, कैले कुटुंबीय, मित्रपरिवार व खंडापूर येथील ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## लातूर पॅटर्नचा गौरव सोहळा : गुणवंतांचा यशोशिखर सन्मान १० जूनला

**लातूर/प्रतिनिधी :** ज्ञान, गुणवत्ता आणि यशाची उज्ज्वल परंपरा जपणाऱ्या जेएसपीएम शिक्षण संस्थेतर्फे दि. १० जून २०२६ रोजी लातूर पॅटर्न यशोशिखर सन्मान सोहळा आयोजित करण्यात आला आहे. हा सोहळा सकाळी १० वाजता जे.एस.पी.एम. शैक्षणिक संकुल, कळंब रोड, एम.आय.डी.सी., लातूर येथे संपन्न होणार आहे.

या भव्य सन्मान सोहळ्याच्या माध्यमातून परिश्रमांना सलाम, यशस्वींचा सन्मान हे ध्येय समोर ठेवून लातूर एस.एस.सी. बोर्ड परीक्षा २०२६ मध्ये १०० टक्के गुण मिळवून यश संपादन करणाऱ्या गुणवंत विद्यार्थ्यांचा गौरव करण्यात येणार आहे. तसेच त्यांच्या पालकांचा, संबंधित संस्थांचे प्रतिनिधी आणि प्राचार्य यांचाही विशेष सन्मान करण्यात येणार आहे.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी जेएसपीएम शिक्षण संस्थेचे उपाध्यक्ष मा. अजित पाटील कव्हेकर हे उपस्थित राहणार आहेत. तर उद्घाटक म्हणून लातूर पॅटर्नचे प्रवक्ते मा. प्राचार्य अनिरुद्ध जाधव तसेच मा. प्राचार्य डॉ. नागोराव कुंभार हे उपस्थित राहणार आहेत. तसेच प्रमुख अतिथी म्हणून दयानंद शिक्षण संस्थेचे सचिव मा. रमेश बियाणी आणि महात्मा बसवेश्वर शिक्षण संस्थेचे सचिव ॲड. माधवराव पाटील टाकळीकर यांची उपस्थित राहणार आहेत.

लातूर पॅटर्नच्या यशस्वी परंपरेला उजाळा देणाऱ्या या प्रेरणादायी सोहळ्यास विद्यार्थी, पालक आणि नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन जेएसपीएम शिक्षण संस्थेतर्फे करण्यात आले आहे.

## गंगामाऊली शुगरचा पेरणीसाठी १२० रु.प्रमाणे शेतकऱ्यांच्या खात्यावर हप्ता जमा

### शेतकऱ्यांच्या चेहऱ्यावरचे हास्य हाच आमचा नफा हे चेअरमन लक्ष्मणराव मोरे यांनी सिद्ध केले




**केज/प्रतिनिधी :** मागच्या तीन गळीत हंगामापासून केज तालुक्यात गंगा माऊली शुगर सुरू झाला आणि शेतकऱ्यांच्या जीवनात खरोखरच क्रांती झाली हा कारखाना चालेल का नाही चालला तर भाव देईल का? असे एक ना अनेक प्रश्न शेतकऱ्यांना सुरुवातीला पडले मात्र अगदी कमी कालावधीत या कारखान्याने शेतकऱ्यांत विश्वास निर्माण केला त्याच वैशिष्ट्य देखील तसेच असून यावर्षीच्या गळीत हंगामात कारखान्याने आजपर्यंत २७०० रू. प्रति टन भाव दिला असून उद्या परत कारखाना १२० रु प्रमाणे दुसरा हप्ता शेतकऱ्यांना पेरणीसाठी जमा करण्यात आला असल्याचे कारखान्याचे चेअरमन लक्ष्मणराव मोरे यांनी सांगितले. बोले तैसा चाले त्याची वंदावी पाऊले या ओळीप्रमाणे लक्ष्मणराव मोरे यांनी शेतकऱ्यांना भावाचा विश्वास दिला आणि शेतकऱ्यांनी हे अनुभवलं देखील आहे. दर पंधरा दिवसाला हा कारखाना रोख बील देत असल्याने हा विश्वास देखील शेतकरी, ऊस तोड मजूर व वाहतूकदार यांनाही आला असून यावर्षीच्या गळीत हंगामात कारखान्याने चांगले गाळप केले आहे मात्र या कारखान्यात केवळ साखरेचे उत्पादन असताना देखील शेतकऱ्यांना योग्य व वेळेत पैसे देण्याचे काम केल्याने सर्व शेतकरी गंगा माऊली शुगर या कारखान्यावर खुश आहेत. चेअरमन लक्ष्मणराव मोरे यांनी गळीत हंगामाच्या वेळी सांगितले होते की आपण पहिली उचल २७०० प्रमाणे देणारा असून पेरणीसाठी देण्यात येणारा दुसरा हप्ता आज १२० रु. प्रमाणे जमा करण्यात आला असून याचा फायदा पेरणीसाठी शेतकऱ्यांना होणार आहे. शेतकऱ्यांच्या वेळेला म्हणजे पेरणीसाठी पैसे मिळणार असल्याने शेतकरी वर्गात समाधान व्यक्त करण्यात आले आहे. यामुळे कारखान्यावरचा विश्वास दिवसेंदिवस वाढतच असल्याचे दिसत आहे.

## मेहकर बसस्थानकाचे लोकार्पण; एसटीच्या आधुनिकीकरणाचा नवा टप्पा सुरु – परिवहन मंत्री

**बुलढाणा/प्रतिनिधी :** महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या आधुनिकीकरण मोहिमेला आणखी एक महत्त्वाचा टप्पा गाठत आज मेहकर येथील नव्याने उभारण्यात आलेल्या अत्याधुनिक बसस्थानकाचे लोकार्पण परिवहन मंत्री तथा एसटी महामंडळाचे अध्यक्ष प्रताप सरनाईक यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी प्रवाशांना सुरक्षित, आधुनिक व दर्जेदार सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी महामंडळ कटिबद्ध असल्याचे त्यांनी सांगितले.

# भगवंताचे नामस्मरण हाच मोक्षप्राप्तीचा यशस्वी मार्ग - ह.भ.प. मंगलताई लोमटे





**लातूर/प्रतिनिधी :** भागवत कथा हा मोक्षप्राप्तीचा अत्यंत प्रभावी आणि पवित्र मार्ग मानला जातो. त्यामुळे विविध ठिकाणी भागवत कथेचे आयोजन मोठ्या श्रद्धेने व भक्तिभावाने करण्यात येते. या कथेच्या माध्यमातून जरासंध राजाचा जन्म, त्याचे कार्य आणि त्या कार्यातून त्याला लाभलेली मोक्षप्राप्ती यांचा सखोल उहापोह करण्यात आलेला आहे. तसेच, नाथ संप्रदायातील हरिपाठामध्ये संपूर्ण जीवनाचे सार मांडण्याचा प्रयत्न दिसून येतो, तर भागवत कथेमध्ये जन्मापासून ते मोक्षप्राप्तीपर्यंतचा जीवनप्रवास कसा असावा, याचे अत्यंत प्रभावी मार्गदर्शन केले जाते. सामाजिक जीवन जगत असताना भगवंताचे अखंड नामस्मरण हाच मोक्षप्राप्तीचा सर्वोत्तम व यशस्वी मार्ग असल्याचे प्रतिपादन भागवताचार्य ह.भ.प.मंगलताई लोमटे कळंबकर यांनी आपल्या प्रभावी प्रवचनातून केले.

यावेळी त्या मजगे नगर येथील 'कैलास निवास' येथे कव्हेकर परिवाराच्यावतीने आयोजित अखंड हरिनाम सप्ताह व श्रीमद् भागवत कथा ज्ञानयज्ञ सोहळ्याच्या तिसऱ्या दिवशी कथा मांडताना बोलत होत्या.

यावेळी उपस्थित मान्यवरांमध्ये जिल्हा परिषदेच्या माजी अध्यक्षा प्रतिभाताई शिवाजीराव पाटील कव्हेकर, भाजपाचे शहर जिल्हाध्यक्ष अजित पाटील कव्हेकर, प्रमोदिनी पाटील कव्हेकर, आश्विनी किशोर पाटील, अनिताताई कदम, रणजित पाटील कव्हेकर, प्रभाग १८ च्या नगरसेविका आदिती अजित पाटील कव्हेकर, सत्यवती चेवले, शोभाताई पाटील, स्वातीताई घोरपडे, प्रतापराव शिंदे, दिलीप पाटील, अप्पासाहेब पाटील, अशोक पाटील, शिवकुमार बिराजदार, संध्याताई जाधव, ह.भ.प. ज्ञानेश्वर चाटे महाराज, दिगंबर शेटे, अमर बिराजदार, राजकुमार शेटे, महादेवी शेटे, आदी मान्यवरांची उपस्थिती होती.

पुढे बोलताना भागवताचार्य ह.भ.प.मंगलताई लोमटे म्हणाल्या की, भागवत कथा ही केवळ धार्मिक परंपरा नसून ती आत्मशुद्धी, मन:शांती आणि जीवनमूल्यांची जाणीव करून देणारी आध्यात्मिक साधना आहे. जीवनात संकटांची छाया असतानाही श्रद्धा, निश्चय आणि भक्ती यांच्या बळावर भागवत कथा पूर्णत्वास नेता येते, याचे उत्तम उदाहरण कव्हेकर परिवाराने घालून दिले आहे, असे त्यांनी नमूद केले.

अधिक मास हा दानधर्म, साधना व पुण्यसंचयाचा कालखंड मानला जातो. या पवित्र काळात भागवत कथा आयोजित करून समाजात आध्यात्मिक जागृती निर्माण करण्याचे कार्य कव्हेकर परिवाराने केले आहे. त्यामुळे या कार्याचे विशेष महत्त्व अधोरेखित होते, असेही त्या म्हणाल्या.

कार्यक्रमाच्या प्रारंभी संयोजन समितीच्या वतीने प्रमुख मान्यवरांचा सन्मान करण्यात आला. तसेच ह.भ.प. मंगलताई लोमटे यांचे स्वागत जिल्हा परिषदेच्या माजी अध्यक्षा प्रतिभाताई पाटील कव्हेकर यांनी केले. यावेळी मनिषा वागदरे, भारतबाई कदम, शिलाबाई पोतदार, शैलजा अपसिंगे, विजयाताई बन्से, मंगलबाई कदम,आशा स्वामी, खटके बाई, कोयले ताई, मिनाबाई इमले, सावित्राबाई कासले, इंदूबाई वागदरे, यलगरवाड ताई यांच्या परिसरातील भावीक भक्त मोठ्या संख्येने भाविक-भक्त उपस्थित होते.

### भागवत कथा हे पुण्य कर्म आहे –प्रतिभाताई पाटील कव्हेकर

यावेळी बोलताना प्रतिभाताई पाटील कव्हेकर म्हणाल्या की, ह.भ.प. मंगलताई लोमटे यांच्या भागवत कथा अनेक ठिकाणी झालेल्या आहेत. मात्र स्वतःच्या घरी प्रथमच भागवत कथा आयोजित करण्याचे भाग्य मला लाभले. भागवत कथा ही अमृतासारखी आहे. यामुळे घर, मन, पण या सर्व गोष्टी पवित्र होतात. घरातील समस्या दूर होतात. आणि पूर्वजांच्या ऋणाईतून मुक्त होण्यासाठी भागवतकथेसारखा दुसरा मार्ग नाही. त्यामुळे मजगे नगर परिसरातील भाविकांनी या भगवद्गीतेचा लाभ घ्यावा असे आवाहन लातूर जिल्हा परिषदेच्या माजी अध्यक्षा सौ.प्रतिभाताई पाटील कव्हेकर यांनी केले.

## राजूर येथे १० जूनला वीरशैव–लिंगायत गोलमेज परिषद

### जनगणना २०२६–२७, अनुभवमंडप मुक्ती व बसवेश्वर शासकीय जयंतीसंदर्भात महत्त्वपूर्ण चर्चा

**लातूर/प्रतिनिधी :** अहमदपूर तालुक्यातील भक्तीस्थळ राजूर येथे बुधवार, दि. १० जून २०२६ रोजी सकाळी ११ ते सायंकाळी ५ या वेळेत ''वीरशैव–लिंगायत गोलमेज परिषद'' आयोजित करण्यात आली आहे. ही परिषद शिवा अखिल भारतीय वीरशैव युवक संघटना यांच्या वतीने संस्थापक तथा राष्ट्रीय अध्यक्ष प्रा. मनोहरराव धोंडे यांच्या नेतृत्वाखाली संपन्न होणार आहे.

भारतीय जनगणना २०२६–२७ मध्ये वीरशैव–लिंगायत समाजाने धर्म व जातीची नोंद कशा पद्धतीने करावी, यावर परिषदेत सविस्तर चर्चा करून एकमुखी निर्णय घेतला जाणार आहे. तसेच बसवकल्याण येथील महात्मा बसवेश्वरांचा बाराव्या शतकातील मूळ अनुभवमंडप व परशूकट्टा मुक्त करून तो जगभरातील पर्यटकांसाठी खुला करावा आणि क्रांतीसूर्य जगज्ज्योती महात्मा बसवेश्वर महाराज यांची अक्षय तृतीयेच्या दिवशी देशभर शासकीय जयंती साजरी करण्यात यावी, या मागण्यांसाठी नवी दिल्लीतील रामलीला मैदान येथे धडक मोर्चा काढण्याबाबतही परिषदेत चर्चा होणार आहे.



प्रा. मनोहरराव धोंडे यांच्या नेतृत्वाखाली शिवा अखिल भारतीय वीरशैव युवक संघटना गेल्या ३० वर्षांपासून देशभर तसेच देशाबाहेरील विविध राज्यांत वीरशैव–लिंगायत समाजाच्या प्रश्नांवर कार्यरत आहे. समाजातील १८ पगड जातींना एकत्र घेऊन समाजहिताची चळवळ उभारण्याचे कार्य संघटनेमार्फत सातत्याने केले जात आहे. शासन दरबारी समाजाच्या न्याय्य हक्कांसाठी शेकडो प्रश्न सोडवून समाजाला न्याय मिळवून देण्यात संघटनेने महत्त्वाची भूमिका बजावली आहे.

या परिषदेस पंचाचार्य मठांसह विरक्त परंपरेतील सुमारे १०० मठाधिपती, २०० शिवकीर्तनकार, प्रवचनकार, गायक–वादक, तसेच राष्ट्रीय व राज्यस्तरीय पदाधिकारी, साहित्यिक, अभ्यासक आणि समाज बांधव मोठ्या संख्येने उपस्थित राहणार आहेत. विविध विषयांवर चर्चा करून पुढील दिशा निश्चित करण्यात येणार आहे.

महाराष्ट्रातील सर्व जिल्ह्यांतील वीरशैव–लिंगायत समाजातील मठाधिपती, शिवकीर्तनकार, प्रवचनकार, गायक–वादक, साहित्यिक, अभ्यासक, शिवा संघटनेचे पदाधिकारी व समाज बांधवांनी या गोलमेज परिषदेस मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन शिवा अ.भा. वीरशैव युवक संघटनेचे संस्थापक तथा राष्ट्रीय अध्यक्ष प्रा. मनोहरराव धोंडे आणि परिषद संयोजकांनी केले आहे.

## मागास प्रवर्गाती विद्यार्थ्यांसाठी कल्याण येथे वसतिगृहाची सुविधा

**मुंबई/प्रतिनिधी :** इतर मागास प्रवर्ग (ओबीसी), विमुक्त जाती, भटक्या जमाती व विशेष मागास प्रवर्गातील उच्च शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी मुंबई उपनगर जिल्ह्याच्या वतीने कल्याण येथे शासकीय मुलांचे वसतिगृह सुरू करण्यात आले आहे. या वसतिगृहामुळे व्यावसायिक आणि बिगर व्यावसायिक अभ्यासक्रमांना प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांना राहण्याची सुविधा उपलब्ध होणार आहे.

जिल्हानिहाय वसतिगृह सुरू करण्याच्या योजनेअंतर्गत हे वसतिगृह कल्याण (कृषी उत्पन्न बाजार समिती, इमारत क्र. ए–१०, पहिला मजला, कल्याण, जि. ठाणे) येथे कार्यान्वित करण्यात आले आहे.

विहित मुदतीत अर्ज करणाऱ्या प्रथम वर्षातील विद्यार्थ्यांना या वसतिगृहात सन २०२६–२०२७ पासून प्रवेश देण्यात येणार आहे, तसेच पदविका अभ्यासक्रम पूर्ण करून पदवी अभ्यासक्रमाच्या द्वितीय वर्षात प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांनाही या योजनेचा लाभ मिळणार आहे. यानंतर जागा उपलब्ध असल्यास पात्र विद्यार्थ्यांना तृतीय व चतुर्थ वर्षासाठीही प्रवेश दिला जाणार आहे. द्वितीय, तृतीय आणि चतुर्थ वर्षातील प्रवेशासाठी बारावी परीक्षेतील अंतिम गुण विचारात घेतले जाणार आहेत.

वसतिगृहातील जागांचे आरक्षण इतर मागास वर्गासाठी ५१ टक्के, विमुक्त जाती व भटक्या जमातींसाठी ३३ टक्के, विशेष मागास प्रवर्गासाठी ६ टक्के, दिव्यांगांसाठी ४ टक्के, अनाथांसाठी २ टक्के आणि आर्थिक मागास प्रवर्गासाठी ४ टक्के असे निश्चित करण्यात आले आहे.

वसतिगृह प्रवेशाबाबतच्या अटी, शर्ती व अधिक माहितीसाठी नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला, आर. सी. चेबूरकर मार्ग, चेंबूर, मुंबई येथे संपर्क साधावा, असे आवाहन इतर मागास बहुजन कल्याण, मुंबई उपनगरच्या सहाय्यक संचालक मयुरी कदम यांनी कळविले आहे.

## इयत्ता १० व १२ वी च्या परीक्षांचे प्रवेशपत्र उपलब्ध

**मुंबई/प्रतिनिधी :** इयत्ता १० व इयत्ता १२ वी च्या जुन – जुलै २०२६ मध्ये होणाऱ्या परीक्षांचे प्रवेशपत्र ऑनलाईन पद्धतीने ८ जून २०२६ पासून उपलब्ध करून देण्यात येत आहे. प्रवेशपत्र महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे यांच्या www.mahahsscboard.in या संकेतस्थळावर Admit Card या लिंकद्वारे डाऊनलोड करण्यासाठी उपलब्ध आहेत.

जून– जुलै २०२६ परीक्षेसाठी सर्व विभागीय मंडळाच्या कार्यकक्षेतील सर्व माध्यमिक शाळा, कनिष्ठ महाविद्यालयांनी प्रवेशपत्रे प्रिंट काढून विद्यार्थ्यांना द्यावीत. या प्रवेशपत्रासाठी कोणतेही शुल्क नसून प्रवेशपत्रावर मुख्याध्यापक किंवा प्राचार्य यांचा शिक्का उमटवून स्वाक्षरी असावी. ज्या आवेदनपत्रांना पेड असे स्टेटस प्राप्त झाले आहे, त्यांचीच प्रवेशपत्रे पेड स्टेटस डमिट कार्ड या पर्यायाद्वारे उपलब्ध होणार आहेत.

तसेच अतिविलंबाने आवेदनपत्रे भरलेल्या व एक्स्ट्रा सीट नंबर विभागीय मंडळामार्फत दिलेल्या विद्यार्थ्यांची प्रवेशपत्रे एक्स्ट्रा सीट नंबर डमिट कार्ड या पर्यायाद्वारे उपलब्ध होतील. डाऊनलोड केलेल्या प्रवेशपत्रामध्ये नाव, आईचे नाव, जन्मतारीख व इतर दुरूस्त्या असल्यास, विषय किंवा माध्यम बदल असल्यास प्रचलित पद्धतीनुसार विभागीय मंडळात प्रत्यक्ष संपर्क साधून त्या दुरूस्त्या करण्यात याव्यात. ज्या आवेदनपत्रांना पेड असे स्टेटस प्राप्त झालेले नाही, अशा आवेदनपत्रांचे शुल्क प्राप्त झाल्यानंतर त्यांचे स्टेटस अपडेट होऊन लेट पेड स्टेटस डमिट कार्ड या ऑप्शन द्वारे त्यांची प्रवेशपत्रे उपलब्ध होतील. प्रवेश पत्रावरील फोटो सदोष असल्यास त्यावर विद्यार्थ्याचा फोटो चिकटवून त्यावर संबंधित मुख्याध्यापक किंवा प्राचार्य यांनी शिक्का मारून स्वाक्षरी करावी.

प्रवेशपत्र विद्यार्थ्यांकडून गहाळ झाल्यास संबंधित उच्च माध्यमिक शाळा किंवा कनिष्ठ महाविद्यालयांनी पुन:श्र्च प्रिंट काढून त्यावर लाल शाईने द्वितीय प्रत असा शेरा देऊन विद्यार्थ्यास प्रवेशपत्र देण्यात यावे. तरी या प्रवेशपत्राबाबत या बाबींची नोंद घेऊन त्याप्रमाणे परीक्षेसाठी प्रविष्ट झालेले सर्व विद्यार्थी, पालक, शिक्षक, मुख्याध्यापक, प्राचार्य सर्व माध्यमिक शाळा व कनिष्ठ महाविद्यालये यांनी कार्यवाही करावी, असे आवाहन महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाचे सचिव डॉ. दिपक माळी यांनी केले आहे.

# राष्ट्रीय सर्जन सप्ताह २०२६ निमित्त रक्तदान शिबीरास लातूरकरांचा उत्स्फुर्त प्रतिसाद




**लातूर/प्रतिनिधी :** राष्ट्रीय सर्जन सप्ताह २०२६ निमित्त सर्जिकल सोसायटी ऑफ लातूरतर्फे गुगळे हॉस्पिटल, लातूर येथे भव्य रक्तदान शिबिराचे आयोजन रविवार दि. ७ रोजी करण्यात आले. या शिबीरात लातूरकरांनी उत्स्फुर्त सहभाग घेत रक्तदान केले. या शिबीरात विक्रमी रक्तदान करणारे रक्तदाते यांचा अनसंग हिरोज ऑफ लातूर पुरस्कार देऊन सत्कार करण्यात आला. तसेच रक्तदान करणाऱ्यां रक्तदात्यांना हेल्मेट भेट देण्यात आले.

रक्तदान शिबीरास खासदार डॉ. शिवाजी काळगे, डॉ. आनंद कामत (अध्यक्ष, MASI), डॉ. राजेंद्र गणेरीवाल (EC ASI व ASI वृक्षारोपण अभियान अध्यक्ष), डॉ. दीपक गुगळे (EC MASI), डॉ. अभिजित रायते (उपाध्यक्ष), डॉ. निखिल काळे (सचिव), डॉ. गणेश स्वामी (सहसचिव) तसेच ज्येष्ठ सर्जन डॉ. डी. एन. चिंते, डॉ. हंसराज बाहेती, डॉ. दिनकर काळे, डॉ. पी. बी. कुलकर्णी, डॉ. विक्रम राजपूत व डॉ. अजय पुनपळे यांची प्रमुख उपस्थिती होती. रक्तदान शिबीर यशस्वी करण्यासाठी इंडियन मेडिकल असोसिएशन (IMA) लातूरचे अध्यक्ष डॉ. हर्षवर्धन राऊत, सचिव डॉ. विश्रांत भारती, खजिनदार डॉ. मन्सूर भोसले, थऊथ च्या अध्यक्षा डॉ. श्र्वेता काटकर, सचिव डॉ. आकांक्षा त्रिपाठी व डॉ. वेदांत अवस्थी यांनीही सहभाग नोंदवत सहकार्य केले. या प्रसंगी रक्तदान क्षेत्रात उल्लेखनीय योगदान देणाऱ्या लातूरच्या दत्ता आपसिंगेकर (१५१ वेळा रक्तदान), अनिल डुंगरवाल (११३ वेळा रक्तदान) आणि पारस चापसी (१३८ वेळा रक्तदान) या रक्तदात्यांचा Unsung Heroes of Latur पुरस्कार देऊन खासदार डॉ. शिवाजी काळगे यांच्या हस्ते गौरव करण्यात आला. याचबरोबर रस्ता सुरक्षा जनजागृती अभियानांतर्गत डॉक्टरांचे सहाय्यक कर्मचारी (फेलो शॅडोज) व वैद्यकीय प्रतिनिधींना हेल्मेटचे वितरण करण्यात आले. समाजसेवा, रक्तदान व रस्ता सुरक्षा या त्रिसूत्रीचा संदेश देणारा हा उपक्रम उत्साहात पार पडला.

### विक्रमी रक्तदान करणारे रक्तदाते यांचा अनसंग हिरोज ऑफ लातूर पुरस्काराने गौरव

वृक्षारोपण कार्यक्रमात प्रमुख अतिथी डॉ. आनंद कामत (अध्यक्ष, MASI) व डॉ. राजेंद्र गणेरीवाल (EC ASI , वृक्षारोपण अभियान अध्यक्ष) होते. डॉ. दीपक गुगळे (EC MASI), डॉ योगानंद दडगे ( अध्यक्ष), डॉ. निखिल काळे (सचिव), डॉ. अभिजित रायते (उपाध्यक्ष),डॉ. गणेश स्वामी (सहसचिव), डॉ अविनाश बदने ( कोषाध्यक्ष) तसेच ज्येष्ठ सर्जन डॉ. डी. एन. चिंते, डॉ. हंसराज बाहेती, डॉ. अजय पुनपळे, डॉ मेघराज चावडा, डॉ बंकट फड, डॉ हळणीकर चंद्रशेखर, डॉ नितीन सरजे व उपस्थित होते.

हे पत्रक मालक, प्रकाशक, संपादक अशोक नामदेवराव हनवते यांचे करीता मुद्रक घोणे नरसिंह पांडूरंग यांनी मॅजिक पब्लीकेशन, शॉप नं. १०, मनपा शॉपींग कॉम्प्लेक्स, गांधी चौक, लातूर - ४१३५१२ येथे छापून कार्यालय द्रोपत माय निवास, खडक हनुमान मंदिर, मिलिंद नगर, लातूर ता. जि. लातूर ४१३५१२ येथे प्रकाशित केले.